VOL- VII ISSUE- I JANUARY 2020 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 6.293 ISSN 2349-638x

# बाबुराव शेडमाके यांचे १८५७ च्या लढ्यातील योगदान

**पुरूषोत्तम शामरावजी इरपतकर**
संशोधक विद्यार्थी इतिहास विभाग
रा.तु.म. नागपूर विद्यापीठ , नागपूर

**सारांश –**

बाबुराव शेडमाके हे एक निगड्या छातीचे योद्धा होते. त्यांनी आपल्या जिवनात अनेक पराक्रम गाजविले होते. त्यामध्येच त्यांनी १८५७ व्या ऊठावात चांदा जिल्ह्यात ब्रिटिश विरोधात महत्त्वपूर्ण योगदान दिले होते. त्या योगदानाचा तपशिलवार आढावा या शोधनिबंधात घेतल्या गेला आहे आणि त्यांच्या योगदानाचे फलीत कसे काय झाले याची पण चर्चा या शोधनिबंधात केल्या गेली आहे.

**प्रस्तावना –**

ब्रिटिशांनी भारतात सत्ता स्थापन केली. खालसा धोरणा अंतर्गत भारतातील संस्थाने खालसा करून साम्राज्य विस्तार करणे सुरू केले. खालसा धोरणाच्या अंतर्गत ब्रिटिशांनी इ.स. १८५७ मध्ये नागपूरचे राज्य खालसा केले. चांदाचे राज्य नागपूर संस्थानाचे अंतर्गत येत होते. त्यामुळे चांदा ही आपोआप ब्रिटिशांच्या नियंत्रणात आले.

रायपूरला इंग्रजी शिक्षण घेत असताना ब्रिटिशांची साम्राज्यवादी शोषणकारी निती बाबुराव शेडमाकेच्या लक्षात आली होती. मध्यप्रांतातील आदिवासीच्या जमीनदाऱ्या ब्रिटिशांनी आपल्या ताब्यात घ्यायला सुरूवात केली होती. जनतेकडून मोठ्या प्रमाणात कर वसुल केल्या जात होता. वारंवार पडणाऱ्या दुष्काळामुळे जनतेची स्थिती दयनीय झाली होती. जमिन महसूल भरण्याकरीता जनता सावकाराकडून कर्ज घेऊ लागली होती. मात्र वारंवार पडणाऱ्या दुष्काळामुळे सावकारांचे कर्ज फेडल्या जात नव्हते. ब्रिटिशांच्या वसाहतवादी धोरणामुळे जनता कर्जबाजारी झाली होती. ब्रिटिश आणि सावकार या दोघांमध्ये जनता भरडली जात होती. सावकारांना ब्रिटिशांचे सरंक्षण होते. ब्रिटिशांच्या संगणमताने सावकार पण जनतेवर अत्याचार करीत होते. ब्रिटिशाचे भूराजस्व न भरणाऱ्या जमिनदारांच्या जमिनी जप्त केल्या जात होत्या. ब्रिटिश जनतेवर पाशवी अत्याचार करू लागले होते. अशा परिस्थितीमध्ये बाबुराव शेडमाकेने ब्रिटिशांच्या विरोधात मध्यप्रांतातील जमिनदारांना एकत्र करणे सुरू केले. ब्रिटिश सरकारच्या विरोधात जनतेला एकजुट होण्यास प्रेरित केले. अशा त्यांच्या अनेक योगदानांचा तपशिलवार वृत्तांत प्रस्तुत शोध निबंधात करण्यात आला आहे.

**संशोधनाचा उद्देश –**

(१)बाबुराव शेडमाके यांच्या इ.स. १८५७ च्या ऊठावातील योगदानाचा आढावा घेणे.
(२)बाबुराव शेडमाके यांच्या योगदानामुळे चांदा जिल्हा आणि मध्यप्रांतातील जनतेवर त्यांच्या कार्याला कितपत प्रभाव पडला याची शहानिशा करणे.
(३)बाबुराव शेडमाके यांच्या उठावांचा ब्रिटिशावर कितपत प्रभाव पडला याची शहानिशा करणे.

**संशोधन पद्धती –** हे संशोधन ऐतिहासिक संशोधन पद्धतीवर आधारित आहे. बाबुराव शेडमाके यांच्यावर लिहिल्या गेलेले लेख, पुस्तके, अग्रलेख, गॅझिटियर, जर्नल मासिके इत्यादीचा संशोधनाकरिता उपयोग करण्यात आला आहे.

देशात उसळलेल्या १८५७च्या स्वातंत्रलढ्याची ज्योत उशीरा का होईना पण बाबुराव शेडमाके यांच्या हृदयात प्रज्वलीत झाली, फडफडली आणि शेवटी विझली.

बाबुराव शेडमाके यांनी आपले स्वातंत्र्य परत मिळविण्याचा निश्चय केला. निश्चय तर मेरू पर्वतासारखा अटल पण मार्गात अडचणी असंख्य शिवाय सभोवताल विश्वासघातकी लोकांचे जाळे फार थोड्या अवधीत या शुर व कल्पक बाबुराव शेडमाके यांनी गोंड व रोहीले यांचे ५०० सैनिक एकत्र केले आणि संपूर्ण राजगड परगणा

आपल्या ताब्यात घेतला ही बातमी चंद्रपूरात पोहोचली तेव्हा कॅप्टन क्रिकटन यांनी प्रतिकारासाठी सैन्य रवाना केले. बाबुराव शेडमाके यांची इंग्रज सैन्याशी नांदगांव घोसरी येथे १२ मार्च १८५८ ला लढाई झाली. इंग्रज सैन्य पराभूत झाले. याच सुमारास अड्पल्ली घोट येथील उपजमीनदार व्यंकटराव पिते राजेश्वराव राजगोंड वय ४३ वर्षे हा बाबुराव शेडमाके याला येऊन मिळाला. त्यामुळे संख्याबळ चांगलेच वाढले. दोघांच्या संयुक्त सैन्याने उत्तरेस गडीसुरुला टेकडीपर्यंत धडक मारली आणि इंग्रजांना सहकार्य करणाऱ्या लोकांना शासन करून खंडणी वसूल केली. त्यांनी टेकडीवर आश्रय घेतला पराभूत झालेले इंग्रज सैन्य पुन्हा एकत्र आले आणि टेकडीला वेढा दिला तेव्हा दगडाचा मारा करून इंग्रज सैन्यांना पिटाळण्यात आले. गडीसूर्ला भागात तर अशी जनश्रुती आहेत की बाबुराव शेडमाके यांनी सभोवतालच्या गावातून हजारो बंड्याची चाके गोळा केली व ती टेकडीच्या उतरणीवरून इंग्रज सैन्यात सोडण्यात आली. पराभवाची बातमी चंद्रपूरला पोहचताच कॅप्टन क्रिक्टन यांनी नविन दमाचे सैन्य रवाना केले दोन्ही सैन्यामध्ये सगनापूर येथे १९ एप्रिल १८५८ला आणि वामनपेठ येथे २७ एप्रिल १८५८ला लढाया झाल्या. या दोन्ही लढायात बाबुराव व व्यंकटराव शेडमाके यांच्या सैन्याशीच सरशी झाली.

लॉर्ड डलहौसीने देशात तारांचे दळणवळण सुरू करून महत्त्वाची कामगिरी केली परंतू त्यांनी अनेक राज्यांना गिळंकृत केल्यामुळे ही उपयुक्त गोष्ट नुकसानकारक आहे असे लोकांना वाटू लागले. त्यावेळी मोलमपल्ली या उपजमिनदारीत तारा लावण्याचे काम सुरू होते. जंगलातील भागात हे तारांचे जाळे पसरले जात होते. ते गुलामगीरीचेच जाळे आहेत असेच तेथील सामान्य लोकांची कल्पना होती त्यामुळे बाबुराव व व्यंकटराव यांच्या संयुक्त सैन्याने चुचगुंडीवर २९ एप्रिल १८५८ रोजी हल्ला चढविला. या हल्यात टेनिग्राफ कर्मचारी आणि त्यांचा एक सहकारी या हल्यात ठार झाला. आणखी एक सहकारी पीटर हा या हल्ल्यात बचावला. तो चंद्रपूरला आला आणि त्याने संपूर्ण वृत्तांत कॅप्टन क्रिकटन यांना सांगीतले.

जिल्हाधिकारी कॅप्टन क्रिफ्टनयाने नागपूरहून कॅप्टन शेक्सपियर या नविन दमाच्या सेनापतीस सैन्यासह बोलाविले आणि इकडे एक गुप्त खलीता घेऊन अहेरीची जमीनदारीन लक्ष्मीबाई (इ.स. १८५१-६१) हिच्याकडे पाठविले. बाबुराव व व्यंकटराव या दोघांनाही पकडून देण्याविषयी त्यात सुचविले आणि हे काम पार पाडले नाही तर बंडखोरांना मदत करण्याचा आरोप ठेऊन पकडण्यात येईल आणि जमिनदारी जप्त करण्यात येईल. असा धाक दिला होता. या धाकाचा अपेक्षित परिणाम झाला आणि लक्ष्मीबाईने बाबुराव शेडमाकेवर मायाची जाळे टाकायला सुरूवात केली. नागपूरवरून बोलाविलेली कॅप्टन शेक्सपियरची तुकडी येऊन पोहोचली. त्या तुकडीला जिल्हाधिकारी कॅप्टन क्रिफ्टन यांनी त्वरीत रवाना केले. घोट येथे १० मे १८५८ रोजी मोठी लढाई झाली इंग्रज सैन्य उधळल्या गेले. इंग्रज चिडुन गेले आणि त्यांनी व्यंकटरावांची ६७ गावाची जमिनदारी जप्त केली तसेच त्यांचा एक नातलग बारीकराव नरसिंगराव राजगोंड वय ६५ वर्षे, दिवाण गंगाधर त्रिंबक काकडकर वय ७० वर्षे आणि नौकर वझीर अली यांना पकडले व त्यांच्या इस्टेटी जप्त केल्या. आपल्याभोवती पाश पसरले आहेत. याची बाबुराव शेडमाके यांना कल्पना नव्हती. लक्ष्मीबाईच्या माणसांनी भोपाळ पट्टनम येथे छापा घालून बाबुराव शेडमाके यांना जुलै १८५८ मध्ये पकडले. उमाजी नाईकास त्यांच्या बहिणीने पकडून दिले. सेनापती तात्या टोपे यांना त्यांचा एक जिवलग मित्र नरवरचा राजा मानसिंह यांने पकडून दिले. या दोन घटनांचे वरील घटनेशी साम्य दिसते. बाबुराव शेडमाके यांना हातात बेड्या घालून अहेरी येथे नेत असताना तो पहाऱ्यावर असलेल्या रोहल्यांच्या साहाय्याने पळून गेला आणि दोन महिने धुमाकूळ घालीत राहिला. सप्टेंबर १८५८ मध्ये लक्ष्मीबाईच्या माणसांनी त्यांना पुन्हा पकडले.

बाबुराव शेडमाके यांना पकडून चंद्रपूरला आणून त्यांच्यावर आरोप लावून खटला चालविला. ऑक्टोंबर १८५८ मरेपर्यंत फाशीची शिक्षा सुनावली.

**सारांश –**

बाबुराव शेडमाके यांनी १८५७ च्या लढ्यात उशीरा झेप घेतली होती. परंतु त्यांच्या लढ्याची प्रतिकारक क्षमता अद्वितीय होती. त्यांनी इंग्रजांना दमछाक करून सोडले. अनेक लढायात इंग्रजांना मर्यादीत साधन आणि सैन्य असूनसुद्धा पराभव केला परंतू मावशी

लक्ष्मीबाई यांच्या फितोरीमुळे ते इंग्रजांच्या जाळ्यात अडकले आणि पराभूत झाले.

**संदर्भ –**

१. शेडमाके पुरूषोत्तम शेडमाके, १८५७ के स्वाधीनता शहीद वीर बाबूराव पूल्लीसुर बाबु राजगोंड, गोंडवाना गोंडी साहित्य प्रसार प्रकाशन चांदागड (चंद्रपूर २००३)

२. राजूरकर अ.ज. चंद्रपूरचा इतिहास हरीवंश प्रकाशन चंद्रपूर

३. कोटनाके ह. म. प्राणहितेचा वीर बाबुराव शेडमाके कुरखेडा २००८

४. मडावी नरेश मधुकर –आदिवासीचे ब्रिटिश विरोधी संदर्भात (इ.स. १८५७ ते १९१०) एक ऐतिहासिक अध्ययन (अप्रकाशित)